# पिंपरी चिंचवड*महानगरपालिका व जिल्हा परिषद पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय जिल्हास्तर बुद्धिबळ स्पर्धा २०२६-२७

खेळाडू व क्रीडा शिक्षक यांच्याकरता महत्त्वाच्या सूचना-
१) प्रत्येक खेळाडूने स्वतःचा chess बोर्ड ,पिसेस आणि पेन आणणे आवश्यक आहे.

२) खेळाडूंनी भिंतीवर लावलेल्या पहिल्या फेरीची पेअरिंग यादी पाहून आपला टेबल नंबर (बोर्ड नंबर), आपला प्रतिस्पर्धी व आपला कलर (पहिले नाव असल्यास White व दुसरे असल्यास Black ) हे सर्व लिहून घ्यावे. त्या टेबल नंबर व कलर नुसार हॉलमधील जागेवर जाऊन बसावे.

३) बसताना आपला टेबल नंबर हा व्हाईट च्या उजव्या हाताला व ब्लॅक च्या डाव्या हाताला येईल अशा रीतीने बसावे. प्रत्येक फेरीनंतर पुढील फेरीच्या यादीबाबतही हीच पद्धत अंमलात आणावी.

४) प्रत्येक गटाची यादी ही शाळेतून ऑनलाइन पद्धतीने आलेल्या प्रवेशिका नुसार तयार झालेलीआहे. त्या व्यतिरिक्त कोणत्याही खेळाडूला प्रवेश दिला जाणार नाही, याची कृपया खेळाडूंनी व क्रीडा शिक्षकांनी नोंद घ्यावी. याचप्रमाणे खेळाडूंमध्ये बदलही करता येणार नाही.

५) मिळालेल्या यादीमध्ये खेळाडूंचा फिडे आयडी अथवा रेटिंग दिलेले नाही. ज्या खेळाडूंनी सूचनेनुसार आपापले रेटिंग कळवले त्या रेटिंग नुसार व त्यानंतर यादीत असलेल्या नाव अथवा आडनाव याच्या पहिल्या अल्फाबेट नुसार सीडींग ची क्रमवारी झालेली आहे. त्याप्रमाणे पहिल्या फेरीचे पेअरिंग केले आहे.

६) हा खेळ वैयक्तिक असल्याने व लिग पद्धत असल्याने पहिल्या फेरीपासून एकाच शाळेच्या दोन खेळाडूंमध्ये लढत लागू शकते.

७) ज्या खेळाडूंना फिडे रेटिंग असेल व ते टाकलेले नसेल , त्यांनी त्वरित पंचांना त्याची माहिती द्यावी. पुढील फेरीपासून त्यांचे रेटिंग टाकले जाईल.

८) स्पर्धा स्विस लीग पद्धतीने खेळवली जाईल. प्रत्येक फेरीसाठी प्रत्येक खेळाडू करता 25 मिनिटे व 10 सेकंद वाढीव (प्रत्येक चालीमागे) अशी वेळ राहील .

९) आपला प्रत्येक फेरीचा सामना संपल्यानंतर दोन्ही खेळाडूंनी आपल्या रिझल्ट शीटवर संपूर्ण माहिती भरून डेट, राऊंड नंबर,टेबल नंबर, दोन्ही खेळाडूंची आपापल्या कलर नुसार नावे व निकाल (व्हाईट जिंकला तर 1-0, ब्लॅक जिंकला तर 0-1व ड्रॉ झाल्यास 1/2-1/2) बरोबर लिहिल्याचे खात्री करून ,दोन्ही खेळाडूंनी सह्या करून , दोघांनीही टेबल वरील पंचांकडे देणे आवश्यक आहे.

१०) दुसऱ्या फेरीपासून पुढे पेअरिंग बघताना खेळाडूंनी आपले यादीत दाखवलेले गुण बरोबर आहेत का हे पाहणे आवश्यक आहे.गुण बरोबर नसल्यास सदर खेळाडूंनी लगेचची फेरी सुरू होण्यापूर्वी पंचांकडे त्वरित संपर्क साधणे आवश्यक आहे.त्यानंतर मात्र आधीच्या फेरीचे गुणांबाबत कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

११) स्वतःचा game झाल्यावर , result दिल्यावर स्पर्धकांनी ताबडतोब हॉलच्या बाहेर जावे. जेणेकरून इतरांना disturb होणार नाही.

१२) एका फेरीचे संपूर्ण gamesसंपल्यावर काही वेळातच पुढच्या फेरीचे पेअरिन्ग झाल्यावर पुढील फेरी सुरु होईल. तरी स्पर्धकांनी हॉल च्या बाजूचे आवार सोडून जाऊ नये.

१३) स्पर्धेच्या पहिल्या दिवशी कमी गुण झालेले काही खेळाडू स्पर्धेतून बाद होणार आहेत (ही स्पर्धा स्विस लीग असल्याने एखादा खेळाडू हरल्यानंतरही त्या दिवशीच्या सर्व फेऱ्या खेळू शकतो) त्याबाबतची सूचना शेवटच्या फेरी पूर्वी देण्यात येईल.
१४) स्पर्धेसंबंधी कोणत्याही तक्रारीसाठी स्पर्धा प्रमुख श्री. भाऊसाहेब खैरे व तांत्रिक संचालक श्री. विवेक भागवत यांच्या द्विसदस्य समितीचा निर्णय अंतिम राहील.

१५) प्रत्येक गटा नुसार स्विस् लिग पद्धतीने होणाऱ्या फेऱ्या खालील प्रमाणे----
१) 14 वर्षाखालील मुले
17 वर्षाखालील मुले
14 वर्षाखालील मुली
17 वर्षाखालील मुली
या गटात नऊ फेऱ्या होतील.
२) 19 वर्षाखालील मुलांच्या गटात आठ फेऱ्या होतील.
३) 19 वर्षाखालील मुलींच्या गटात पाच फेऱ्या होणार आहेत.
वरील दोन गटात खेळाडूंची हजर संख्या पाहून एखादी फेरी वाढू किंवा कमी होऊ शकेल. ते पहिल्या फेरी पूर्वी सांगण्यात येईल.

१६) टायब्रेक चे नियम---
शेवटच्या फेरीनंतर खेळाडूंनी मिळवलेल्या मुख्य गुणांची बरोबरी झाल्यास (गुण समान झाल्यास) खालील क्रमानुसार टाय ब्रेक पद्धतीचा अवलंब केला जाईल.
1) Buchholz Cut 1 (Forfeit Included)
2) Buchholz Points(Forfeit Included)
3) S. B. Points(Forfeit Included)
4) Direct Encounter
5) No of Wins(Forfeit Included)
6) No of Black Wins(Forfeit Included)

१७) पहिल्या पाच क्रमांकासाठी :
मुख्य गुण व सर्व टाय ब्रेक गुण सारखे झाल्यास ज्या खेळाडूंचे हे सर्व गुण सारखे असतील त्या खेळाडूंमध्ये दहा मिनिटे व पाच सेकंद वाढीव वेळ प्रत्येकी असा सामना घेऊन टाय ब्रेक केला जाईल.

१८) ही स्पर्धा जागतिक बुद्धिबळ संघटनेच्या (फिडे) नियमानुसार खेळविली जाते व पेअरिंगही स्विस मॅनेजर या फिडे मान्यता प्राप्त सॉफ्टवेअरने केले जाते.

१९) खेळाडूंकरिता काही महत्त्वाचे नियम:

१) मोबाईल फोन,कोणतेही इलेक्ट्रॉनिक उपकरण व हातातील घड्याळ या गोष्टी खेळाडूंना बाळगण्यास मनाई आहे. खेळाडूंनी फेरी चालू होण्याआधी मोबाईल असल्यास तो पालकांकडे किंवा शिक्षकांकडे देऊन खेळायला बसावे अथवा स्विच ऑफ करून आपल्या बॅगमध्ये ठेवण्यास  हरकत नाही. वापर करताना सापडल्यास वा मोबाईल वाजल्यास त्या खेळाडूचा त्या फेरीचा गुण जाईल त्यासंबंधी कुठलीही तक्रार चालणार नाही.

२) illegal Move-

1st illegal Move is allowed. 2nd is lost.

'illegal Move' केलेल्या खेळाडूच्या  प्रतिस्पर्धी खेळाडूने लगेचच पंचाना बोलावून रिझल्ट शीट वर मार्किंग आणि त्यांची सही घेणे बंधनकारक आहे. (Move केल्यावर क्लॉक दाबल्यानंतरच(क्लॉक असल्यास) move पूर्ण झाली असे समजले जाते.त्यामुळे illegal move करणाऱ्या खेळाडूंने क्लॉक press केलेले नसेल तर प्रतिस्पर्धी खेळाडूचा क्लेम valid ठरणार नाही.)

३) Walk Over Time - 25 Minutes - प्रतिस्पर्धी खेळाडू फेरी सुरू झाल्यानंतर 25 मिनिटांच्या आत येऊ शकला नाही तर हजर असलेल्या खेळाडूला एक गुण मिळेल त्यासाठी त्या खेळाडूने तो पूर्णवेळ जागेवर बसणे आवश्यक आहे.

Walk Over निकाल लिहिण्याची पद्धत पुढील प्रमाणे-

White हजर असल्यास  + -

Black हजर असल्यास   - +